महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२८३९९२४
ई मेल:- sopr२.rdd-mh@nic.in

क्रमांक:ग्रापंनि-२०२६/प्र.क्र.१९/पं.रा.२

दिनांक :-२१ फेब्रुवारी, २०२६

प्रति,

(१) सर्व विभागीय आयुक्त
(२) सर्व जिल्हाधिकारी
(३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

**विषय:-** मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर "प्रशासक" नेमणेबाबत.

महोदय/महोदया,

क्रमांक:ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१५९/ई-१४७२३३४/पं.रा.२, दिनांक २३ जानेवारी, २०२६ अन्वये निर्गमित करण्यात आलेले पत्र याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२. सोबत क्रमांक:याचिका-२०२६/प्र.क्र.२०/ई-१५५५१७२/पं.रा.२, दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक ८१ अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेची प्रत (मराठी व इंग्रजी) सोबत जोडली असून तीचे कृपया अवलोकन व्हावे.

३. सदर अधिसूचनेतील निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावी, ही विनंती.

**सोबत:-** अधिसूचनेची प्रत

BABURAO MAHADU ASOLE

Digitally signed by BABURAO MAHADU ASOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=dd67f0d38c29ae85f8559e65d2f9d423f04fabb3383af844cc7c057d58b4167a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EEFD6CD19B53F91865DAD89AA72A32B839329DB61848 40A0F533230BD96705E, cn=BABURAO MAHADU ASOLE
Date: 2026.02.21 14:39:31 +05'30'

(बा. म. आसोले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- कार्यासन पं.रा.२, निवडनस्ती

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक २३] शुक्रवार, फेब्रुवारी २०, २०२६/फाल्गुन १, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक २० फेब्रुवारी, २०२६

### अधिसूचना

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९.**

क्रमांक याचिका-२०२६/प्र.क्र.२०/ई-१५५५१७२/पं.रा.२.— ज्याअर्थी, राज्यातील काही ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे आणि काही ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारी २०२६ किंवा त्यापूर्वी संपणार आहे आणि त्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका प्रशासकीय अडचणींमुळे पूर्ण होऊ शकल्या नाहीत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या (१९५९ चा ३) कलम १५१ च्या उप-कलम (१) च्या खंड (अ) मधील दुसऱ्या परंतुकानुसार, प्रशासकीय अडचणींमुळे पंचायत निवडणुका घेणे शक्य नसल्यास, **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एखाद्या योग्य व्यक्तीची पंचायतीवर प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचे अधिकार राज्य शासनास आहे;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १८२ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्या संदर्भात सक्षम करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याचे कलम १५१ अन्वये प्रदान केलेले आपले अधिकार त्याच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करीत आहे आणि खालीलप्रमाणे निर्देश देत आहे,—

अ) संबंधित ग्रामपंचायतीवर विद्यमान सरपंचाची, सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा ग्रामपंचायत स्थापनेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी असेल त्या कालावधीसाठी प्रशासक म्हणून नियुक्ती करणे;

(ब) पंचायतीचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी विद्यमान उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती स्थापन करणे; आणि

(क) उक्त अधिनियम आणि त्याखालील नियमानुसार प्रदान केलेले सर्व अधिकार वापरण्यासाठी आणि कर्तव्यांचे पालन करण्यासाठी प्रशासक आणि समित्यांना आवश्यक सूचना निर्गमित करणे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वर्षा मुं. भरोसे,**
शासनाच्या सहसचिव.

**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT**

Bandhkam Bhawan, 25 Marzban Path, Fort,
Mumbai 400 001 dated the 20th February, 2026

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT, 1959.

No Yachika-2026/C.R.20/E-1555172/Para-2.— Whereas the term of certain Village Panchayats in the State have been expired and term of certain Village Panchayats to be expired on or before 28th February 2026 and the elections of the said Village Panchayats could not be completed due to administrative difficulties ;

And whereas, the second proviso to clause (*a*) of sub-section (*1*) of section 151 of the Maharashtra Village Panchayat Act (III of 1959), empowers the State Government to appoint a suitable person as the Administrator on Panchayats, by notification in the *Official Gazette,* if due to administrative difficulties it is not possible to hold Panchayat elections ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 182 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby delegate its powers to appoint Administrator on the Village Panchayats conferred under section 151 to the Chief Executive Officer of the Zilla Parishad within his jurisdiction and direct,—

(a) to appoint existing Sarpanch of the Village Panchayat as Administrator on the said Panchayat for a period of six months or till the completion of the election process of constitution of the Village Panchayat, whichever is earlier,

(b) to constitute administrative committee of existing Deputy Sarpanch and members of Village Panchayat for smooth functioning of Panchayat; and

(c) to issue necessary instructions to the Administrator and committees to exercise and perform all the powers and duties as provided under the said Act and the rules made thereunder.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VARSHA M. BHAROSE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.